दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप
उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उपसंपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

बीड महाराष्ट्र | शुक्रवार, 12 जून 2026 |
अंक क्र. 39 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# भक्तीचा अभूतपूर्व महासागर !

## अस्वलांबा गावकऱ्यांची 'आळंदी देवाची वाराणसी (काशी) -अयोध्या' यात्रा उत्साहात सुरू आयोजकांचे चोख नियोजन

■ थेट यात्रेतून विशेष वृत्तांकन - नितीन ढाकणे

**भक्ती, श्रद्धा आणि आबालवृद्धांच्या अभूतपूर्व उत्साहात अस्वलांबा गावकऱ्यांच्या वतीने आयोजित ‘आळंदी-वाराणसी-काशी-अयोध्या’ यात्रेचा दुसरा टप्पा अत्यंत दिमाखात सुरू झाला आहे. गावातील लहान-थोर, तरुण आणि वृद्धांचा यामध्ये मोठा सहभाग असून संपूर्ण अस्वलांबा गाव भक्तीच्या रंगात रंगून गेले आहेत.**




### माऊलींच्या चरणी लीन होऊन यात्रेचा प्रारंभ

■ यात्रेचा दुसरा टप्पा दिनांक १० जून रोजी मार्गस्थ झाला. त्यानंतर दिनांक ११ जून रोजी सकाळी सर्व भाविकांनी आळंदी येथे संत ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधीचे दर्शन घेतले. माऊलींचा आशीर्वाद घेऊन दुपारी यात्रेकरूंनी वाराणसीसाठी प्रस्थान केले.

### असे असेल यात्रेचे पुढील नियोजन

- १२ जून (संध्याकाळी): साधारण दोन दिवसांचा रेल्वे प्रवास पूर्ण करून ही यात्रा वाराणसी जवळील 'पंडित दीनदयाल उपाध्याय' स्टेशनवर पोहोचेल.
- १३ जून (सकाळी) वाराणसी येथे भगवान काशी विश्वनाथाचे दर्शन संपन्न होईल.
- १३ जून (दुपारी): काशी दर्शन आटोपून सर्व गावकरी प्रभू श्रीचंद्रांच्या दर्शनार्थ 'अयोध्या नगरी'कडे प्रस्थान करतील.
- पहिल्या टप्प्यात २५० हून अधिक भाविकांनी यात्रेचा आनंद घेतला होता, तर आता दुसऱ्या टप्प्यात साधारण ५०० गावकरी या अध्यात्मिक सोहळ्यात सहभागी झाले आहेत.







### कौतुकास्पद नियोजन: कौटुंबिक जिव्हाळ्याने सुरू आहे सांभाळ

■ ५०० लोकांचा हा समुदाय, यांच्या चहा-पाण्यापासून ते राहण्या-जेवणापर्यंतची व्यवस्था करणे हे अत्यंत जबाबदारीचे काम असते. मात्र, मुख्य आयोजक श्री. श्रीकृष्ण पांडुरंग ढाकणे व त्यांच्या सुविद्य पत्नी, तसेच त्यांचे लहान बंधू श्री. गोविंद पांडुरंग ढाकणे व त्यांच्या सुविद्य पत्नी हे सर्वजण अत्यंत आत्मीयतेने ही जबाबदारी पार पाडत आहेत. प्रत्येक यात्रेकरूची वैयक्तिक विचारपूस zरणे, त्यांना कोणत्याही प्रकारची उणीव भासू न देणे आणि प्रत्येकाला घरच्यासारख सांभाळणे, या त्यांच्या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. या कार्यात गावातील उत्साही तरुण वर्गही अहोरात्र मदत करत असून व्यवस्थेत कुठेही कमतरता पडणार नाही, याची काळजी घेतली जात आहे. अस्वलांबा गावकऱ्यांची ही एकजूट आणि भक्तिभाव पाहून संपूर्ण परिसरात या यात्रेची आणि आदर्श नियोजनाची जोरदार चर्चा सुरू आहे.

## प्रथम पसंतीचे मतदान देऊन बसवराज पाटील यांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्या : आ .सुरेश धस

### आष्टीतील संवाद बैठकीत बसवराज पाटील यांच्या विजयाचा निर्धार



■ आष्टी प्रतिनिधी:

लातूर-बीड-धाराशिव स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीचे अधिकृत उमेदवार बसवराज माधवराव पाटील यांच्या प्रचारार्थ आष्टी येथील अद्वैतचंद्र निवास येथे आयोजित संवाद बैठकीत महायुतीच्या पदाधिकारी, नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक आणि लोकप्रतिनिधींनी एकजुटीचे जोरदार प्रदर्शन केले. यावेळी आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी उपस्थितांना संबोधित करत बसवराज पाटील यांना प्रथम पसंतीचे मतदान करून विक्रमी मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन केले.

आ.सुरेश धस म्हणाले की, राजकारण हे केवळ पक्षीय सीमा आणि मतभेदांपुरते मर्यादित नसून जनतेच्या विकासाशी निगडित असते.केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सक्षम आणि अभ्यासू नेतृत्व विधान परिषदेत पोहोचणे गरजेचे आहे. विकासाच्या मुद्द्यावर सर्वांनी एकत्र येणे ही काळाची गरज आहे. अनेकदा वैयक्तिक हेवेदावे आणि राजकीय मतभेद विकासाच्या आड येतात, मात्र जनतेच्या हितासाठी ते बाजूला ठेवणे आवश्यक आहे. बसवराज पाटील यांच्यासारखे अनुभवी, संयमी आणि विकासाभिमुख नेतृत्व विधान परिषदेत गेले तर मराठवाड्याच्या विकासाला नवी गती मिळेल.ते पुढे म्हणाले की, बसवराज पाटील यांचा राजकीय प्रवास हा सातत्य, संघर्ष आणि जनसंपर्काचा आदर्श आहे. १९९९ पासून त्यांनी राजकारणात अखंड कार्य करत जनतेचा विश्वास संपादन केला आहे. त्यांची कार्यपद्धती, नम्र स्वभाव आणि सर्वांना सोबत घेऊन चालण्याची वृत्ती ही त्यांची मोठी ताकद आहे. म्हणूनच पक्षीय सीमा ओलांडून अनेक लोकप्रतिनिधी त्यांना पाठिंबा देत आहेत. विधान परिषदेत त्यांची निवड झाल्यास लातूर, बीड आणि धाराशिव या तीनही जिल्ह्यांच्या प्रश्नांना सक्षम आवाज मिळेल,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महायुतीचे उमेदवार बसवराज माधवराव पाटील यांनी आपल्या भाषणात आ. सुरेश धस यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना सांगितले की, हा मतदारसंघ महाराष्ट्रातील अत्यंत प्रतिष्ठेचा आणि राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा मतदारसंघ आहे. या मतदारसंघाने आ.सुरेश धस यांचा सारखा सक्षम नेता दिला आहे. त्यांनी आपल्या धडाडीच्या नेतृत्वातून आणि विकासकामांच्या पाठपुराव्यातून आष्टी मतदारसंघाला राज्याच्या राजकारणात वेगळी ओळख मिळवून दिली आहे. "लोकप्रतिनिधी म्हणून जनतेसाठी कसे झटावे, प्रशासनाकडून कामे कशी करून घ्यावीत आणि जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष कसा करावा, हे मी सुरेश धस यांच्याकडून शिकलो आहे," असे गौरवोद्गार बसवराज पाटील यांनी काढले. ते पुढे म्हणाले की, माझा आणि धस साहेबांचा चार दशकांहून अधिक काळाचा राजकीय सहवास आहे.

उमेदवारी जाहीर होताच सर्वप्रथम धस साहेबांशी संवाद साधला. त्यांनी ज्या विश्वासाने आणि ताकदीने माझ्या पाठीशी उभे राहून साथ दिली आहे, तो माझ्यासाठी मोठा आधार आहे. यापुढे मराठवाड्याच्या विकासासाठी मी पूर्ण ताकदीने काम करणार आहे. आ.सुरेश धस यांच्या नेतृत्वावर विश्वास टाकत पक्षीय सीमा उलाडून बैठकीत उपस्थित लोकप्रतिनिधींनी महायुती सरकारच्या विकासाभिमुख धोरणांचे स्वागत करत बसवराज पाटील यांना विक्रमी मताधिक्याने विजयी करण्याचा निर्धार व्यक्त केला. मराठवाड्याच्या विकासाला चालना देण्यासाठी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि वरिष्ठ सभागृहात सक्षम प्रतिनिधित्व निर्माण करण्यासाठी ही निवडणूक महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.



## पेशवा प्रतिष्ठानच्या बिनव्याजी शैक्षणिक मदत योजनेचे पहिले यश ;विद्यार्थ्याचे एमबीबीएस शिक्षण पूर्ण

■ अंबाजोगाई प्रतिनिधी:-

शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील होतकरू व गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक बळ देण्याच्या उद्देशाने पेशवा प्रतिष्ठान, अंबाजोगाई यांनी सुरू केलेल्या बिनव्याजी शैक्षणिक मदत योजनेचा पहिला विद्यार्थी डॉ. पवन पंढरीनाथ कुलकर्णी हा आता वैद्यकीय शिक्षण (एमबीबीएस) पूर्ण करून डॉक्टर झाला आहे. ही बाब प्रतिष्ठानसाठी तसेच संपूर्ण अंबाजोगाई परिसरासाठी अभिमानास्पद ठरली आहे.

आर्थिक अडचणींमुळे अनेक विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची स्वप्ने अपूर्ण राहतात. ही गरज ओळखून पेशवा प्रतिष्ठानने काही वर्षांपूर्वी बिनव्याजी शैक्षणिक मदत योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना कोणतेही व्याज न आकारता आर्थिक मदत देण्यात येते, ज्यामुळे त्यांना शिक्षणाचा प्रवास निर्धास्तपणे पूर्ण करता येतो.

या योजनेचा लाभ घेणाऱ्या पवन कुलकर्णी या पहिल्या विद्यार्थ्याने एमबीबीएस पदवी यशस्वीरित्या संपादन करून प्रतिष्ठानच्या कार्याची सार्थता सिद्ध केली आहे. पवन कुलकर्णी यास मागील चार वर्षापासून दरवर्षी पन्नास हजाराची बिनव्याजी शैक्षणिक मदत करण्यात येते.विद्यार्थ्याच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार असून समाजातील दानशूर व्यक्तींनी अशा शैक्षणिक उपक्रमांना अधिकाधिक सहकार्य केल्यानेच सदरील उपक्रम सुरू आहे. पवन कुलकर्णी याने पेशवा प्रतिष्ठान व या उपक्रमास मदत करणाऱ्या दानशूर व्यक्तींचे आभार व्यक्त केले.

यावेळी पेशवा प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्याचे अभिनंदन करताना सांगितले की, "शिक्षण हीच खरी समाजसेवा असून गरजू विद्यार्थ्यांना मदत करण्याचा आमचा संकल्प यापुढेही कायम राहील. पेशवा प्रतिष्ठान अश्याच समाजपयोगी कार्यासाठी कायम अग्रेसर राहील."

विद्यार्थ्याच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विविध सामाजिक, शैक्षणिक व वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांनी त्याचे तसेच पेशवा प्रतिष्ठानच्या उपक्रमाचे कौतुक केले आहे. अधिक माहितीसाठी अमृत महाजन, सुजित दीक्षित, संतोष कुलकर्णी, राहुल कुलकर्णी, डॉ महेश अकोलकर यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येते.

संपादकीय

## अधिक मासातील रंजक, पण चिंताजनक चित्र

हिंदू संस्कृतीत तीन वर्षांनी येणाऱ्या अधिक मासात (धोंड मास) जावयाला घरी बोलावून त्याचा शाही पाहुणचार करण्याची आणि त्याला गोडधोड खाऊ घालण्याची एक सुंदर प्रथा म्हणजे 'धोंडे जेवण'. मात्र अधिक मासनिमित्त केला जाणारा धोंडे जेवणाचा कार्यक्रम वेगळ्याच वळणावर येऊन थांबलेला आहे.

अधिक मासानिमित्त सासुरवाडीत सध्या जावयांसाठी पुरणपोळी, आमरसासोबत धोंडे जेवण देऊन सोन्याच्या अंगठीसह आहेर केला जात आहे. मराठवाड्यात धोंडे जेवणाबाबत अनेक रंजक घटना समोर येत आहेत. काही ठिकाणी तर चक्क राजकीय मंडळींकडून धोंडे जेवणाचे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. त्यामध्ये नर्तकींचे सादरीकरण, ऑर्केस्ट्रा आणि गावजेवण अशा माध्यमातून विविध प्रयोगही पाहायला मिळत आहेत. बीड जिल्ह्यात एका मांजरीने सोन्याची अंगठी ठेवलेला धोंडा खाल्ल्याची घटना घडली. त्यानंतर त्या मांजरीला चार दिवस कैदेत ठेवण्यात आले. तरीही अंगठी सापडत नसल्याने शेवटी शस्त्रक्रिया करून मांजरीच्या पोटातून ती अंगठी काढण्यात आली.

नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस समर्थक असलेल्या एका पदाधिकाऱ्याने धोंडे जेवणाचा कार्यक्रम नर्तक-नर्तकींच्या सादरीकरणासह पार पाडला. दरम्यान, हिंगोली जिल्ह्यात धोंडे जेवणासाठी सासुरवाडीला आलेल्या एका जावयाला जुन्या वादातून चुलत मेहुण्याने बेदम मारहाण केल्याची घटना घडली. औंढा नागनाथ तालुक्यातील येडू येथे ही घटना घडली. लाकडी काठीने झालेल्या मारहाणीत जावई जखमी झाला असून, हे प्रकरण पोलिसांपर्यंत गेले आहे. त्यानंतर औंढा नागनाथ पोलीस स्थानकात या प्रकरणी गुन्हा देखील दाखल करण्यात आला. अधिक मासनिमित्त केला जाणारा धोंडे जेवणाचा कार्यक्रम वेगळ्याच वळणावर येऊन थांबलेला आहे.

आणखी एक हृदयद्रावक घटना बीड जिल्ह्यात काल घडली. अधिक मासाच्या निमित्ताने माजलगाव तालुक्यातील श्रीक्षेत्र पुरुषोत्तमपुरी येथे दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक दाखल झाले होते. याच गर्दीदरम्यान, काही भाविकांची बोट अचानक उलटल्याची दुर्घटना घडली. या अपघातात दोन महिलांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला असून, बारा महिला गंभीर जखमी झाल्या आहेत. मृत झालेल्या दोन्ही महिला विदर्भातील असल्याची माहिती मिळाली आहे. जखमींपैकी एका महिलेला वेळेत वैद्यकीय उपचार मिळाल्यामुळे तिचा जीव वाचवण्यात यश आले. प्राथमिक तपासात बोटीत क्षमतेपेक्षा अधिक भाविक बसवण्यात आल्याने ही दुर्घटना घडल्याचे तहसीलदार दामोदर जाधव यांनी स्पष्ट केले आहे. प्रशासनाकडून पुढील तपास सुरू असून, सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटींचाही आढावा घेतला जात आहे. दरम्यान, अधिक मासानिमित्त मराठवाड्यातील सर्वच बसस्थानकांवर प्रवाशांची मोठी गर्दी दिसून येत आहे. जावयांचा मानसन्मान, तसेच त्यांना दिले जाणारे स्नेहभोजन यामुळे ग्रामीण भागात सध्या उत्साहाचे आणि सणासुदीचे वातावरण निर्माण झाले आहे. धार्मिक स्थळांवरही मोठ्या प्रमाणावर भाविकांची वर्दळ पाहायला मिळत असून, सर्वत्र श्रद्धा आणि उत्साहाचे वातावरण आहे.

माहूर येथील रेणुका देवी, औंढा नागनाथ येथील नागनाथ मंदिर तसेच परळी येथील मंदिर परिसरात सध्या अधिक मास आणि धोंडे जेवणानिमित्त भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. विशेषतः जावई व लेकींना धोंडे जेवणासाठी निमंत्रित करण्याची परंपरा ग्रामीण भागात आजही मोठ्या उत्साहात पाळली जात असून, कुटुंबातील आपुलकी, स्नेह आणि सामाजिक नातेसंबंध अधिक दृढ करण्याचा एक भाग म्हणून या प्रथेकडे पाहिले जाते. या निमित्ताने धार्मिक स्थळांवर केवळ धार्मिक विधीच नव्हे तर सामाजिक भेटीगाठी, कौटुंबिक एकत्रीकरण आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन मोठ्या प्रमाणात होत आहे. दुसरीकडे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या परंपरेला राजकीय रंगही चढताना दिसत आहे, असे काही ठिकाणी बोलले जात आहे.

विधान परिषदेच्या राजकीय समीकरणांवर प्रभाव टाकण्यासाठी काही उमेदवारांकडून मतदारांशी संपर्क वाढवण्याचे प्रयत्न विविध माध्यमांतून सुरू असल्याचे चित्र दिसते. त्यातच धोंडे जेवणाच्या निमित्ताने मतदारांना सहलीचे निमंत्रण देणे, लहान-मोठ्या भेटवस्तू देणे किंवा पॅकेज टूर्सचे आयोजन करणे अशा गोष्टी घडत असल्याच्या चर्चा ग्रामीण भागात रंगत आहेत. काही ठिकाणी निवडक मतदारांसाठी विशेष सहलींची व्यवस्था, तर काही ठिकाणी गटागटाने प्रवासाची सोय केली जात असल्याचेही सांगितले जाते.

मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांत या धोंडे जेवणाच्या सरसकथा ऐकावयास मिळत आहेत. यंदाचा अधिक मास हा राजकारणी लोकांना पावणारा ठरत आहे. सत्ताधारी मतदारच नव्हे, तर विरोधी पक्षांतील मतदारही धोंडे जेवणाच्या निमित्ताने मिळणाऱ्या पॅकेज टूर्सचा फायदा घेत आहेत. अधिक मासाच्या या काळात मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये धोंडे जेवणाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन मोठ्या प्रमाणात होत आहे. सत्ताधारी असो वा विरोधी पक्ष, अनेक राजकीय घटक या कार्यक्रमांच्या माध्यमातून जनसंपर्क वाढविण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून येते. काही ठिकाणी हे कार्यक्रम सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम म्हणून साजरे होत असले तरी, त्यातून राजकीय उपस्थिती आणि प्रभाव दाखविण्याची संधीही घेतली जात असल्याची चर्चा आहे. परिणामी, ग्रामीण भागात या कार्यक्रमांना उत्सवी स्वरूप प्राप्त झाले असून, लोकांमध्ये त्याबद्दल उत्सुकता आणि चर्चा दोन्ही वाढल्या आहेत. दरम्यान, काही भागांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोन्याच्या खरेदीबाबत केलेल्या आवाहनाचा संदर्भ देत असले तरी, ग्रामीण भागात धोंडे जेवणाच्या वेळी जावयाला सोन्याची अंगठी देण्याची परंपरा आजही काही कुटुंबांमध्ये पाळली जात असल्याचे दिसते. सोन्याला मान देण्याची ही जुनी प्रथा सामाजिक प्रतिष्ठा आणि आपुलकीचे प्रतीक मानली जाते. त्यामुळे आधुनिक आर्थिक आवाहनांनंतरही काही रूढी-परंपरा ग्रामीण संस्कृतीत टिकून राहिल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येते. एकूणच, अधिक मासातील धोंडे जेवणाच्या निमित्ताने धार्मिक श्रद्धा, कौटुंबिक स्नेह, सामाजिक परंपरा आणि राजकीय हालचाली यांचा एकत्रित संगम मराठवाड्यातील ग्रामीण भागात पाहायला मिळत आहे. या सर्व घडामोडींमुळे या काळाला एक वेगळे सामाजिक आणि राजकीय महत्त्व प्राप्त झाले असून, स्थानिक पातळीवर त्यावर विविध चर्चांना उधाण आले आहे.

# परळीत हिटलरशाहीचा कारभार ?

## पत्रकार गृहनिर्माण संस्थेला दिलेली जागा नमो उद्यानासाठी कशी?

### पत्रकारांच्या हक्काच्या ६० गुंठे जागेवर डल्ला टाकण्याचा प्रयत्न; मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व गृहनिर्माण मंत्र्यांकडे दाद मागणार : दीपक देशमुख

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

परळी नगरपालिकेच्या कारभारात लोकशाहीपेक्षा हुकूमशाहीचेच वर्चस्व वाढत असल्याचा आरोप करत माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांनी पत्रकार गृहनिर्माण संस्थेसाठी पूर्वी मंजूर करण्यात आलेल्या जागेवर नमो उद्यान उभारण्याच्या हालचालींवर तीव्र नाराजी व्यक्त केली. पत्रकारांच्या हक्काच्या जागेची प्रशासनाला आठवण करून देण्यासाठी नंदागौळ रोड परिसरातील संबंधित जागेवर प्रतिकात्मक उद्घाटन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार बालासाहेब कडबाने, प्रकाश सूर्यकर, आत्मलिंग शेटे, धीरज जंगले, बाबा शेख, धनंजय अरबुने, संतोष जुजगर, प्रल्हाद कडुकटले, बालाजी ढगे, सुकेशनी नाईकवाडे, संजीब रॉय, संदीप मस्के, बालाजी जगतकर, गौतम आगळे, पद्माकर भंडारे, नितीन चव्हाण यांच्यासह अनेक पत्रकार उपस्थित होते.

**नगराध्यक्षांच्या हितासाठी जागेचा वापर?**

परळीचे विद्यमान नगराध्यक्ष पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांची संबंधित जागेजवळ शेती असल्याचा उल्लेख करत दीपक देशमुख यांनी गंभीर आरोप केला की, नमो उद्यान उभारल्यास परिसरातील जमिनींचे भाव वाढतील आणि त्याचा थेट फायदा काही मोजक्या व्यक्तींना होऊ शकतो. याच उद्देशातून पत्रकार गृहनिर्माण संस्थेसाठी राखीव असलेली ६० गुंठे जागा नमो उद्यान प्रकल्पात समाविष्ट करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

**१५ वर्षांपूर्वीचे आश्वासन धुळीस मिळाले?**

देशमुख म्हणाले की, सुमारे पंधरा वर्षांपूर्वी तत्कालीन विरोधी पक्षनेते तथा विद्यमान आमदार धनंजय मुंडे यांच्या हस्ते सर्व्हे क्रमांक ४२२ मधील ६० गुंठे जागेचे पत्रकार गृहनिर्माण संस्थेसाठी भूमिपूजन करण्यात आले होते. त्या वेळी पत्रकारांना हक्काची जागा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र आज त्याच जागेवर नमो उद्यान उभारण्याचा प्रस्ताव पुढे आल्याने पत्रकारांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

**"जागा एकच, योजना मात्र अनेक"**

नगरपालिकेच्या मालकीच्या या जागेचा विविध काळात डम्पिंग ग्राउंड, घनकचऱ्यापासून खत निर्मिती प्रकल्प, अग्निशामक दलाचा तळ, न. प.कर्मचारी निवासस्थान, सुशिक्षित बेकार सप्तशृंगी संस्थेला ही हीच जागा,ऑक्सिजन पार्क आणि काही दिवसांनी पत्रकार गृहनिर्माण संस्था अशा विविध योजनांसाठी जागेचा वापर करण्यात आल्याचे माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांनी निदर्शनास आणून दिले. आता त्याच जागेवर नमो उद्यानाचा प्रस्ताव पुढे आणला जात असल्याने "जागा एकच आणि फलक मात्र वेगवेगळे" अशी परिस्थिती निर्माण झाली असल्याची टीका त्यांनी केली.

**दिवंगत पत्रकारांच्या स्मृतींचा प्रश्न**

पत्रकार गृहनिर्माण संस्थेच्या भूमिपूजनाचे साक्षीदार असलेले ज्येष्ठ पत्रकार प्रेमनाथ कदम, प्रशांत जोशी, दिलीप बदर आणि सतीश बियाणी यांच्यासह अनेक पत्रकार आज हयात नाहीत. त्यांच्या स्मृतींचा सन्मान राखण्यासाठी तरी पत्रकारांसाठी राखीव असलेली जागा पत्रकारांनाच देण्यात यावी, अशी भावनिक मागणी यावेळी करण्यात आली.

**संघर्षाची तयारी**

"जोपर्यंत पत्रकार गृहनिर्माण संस्था नियोजित जागेवर प्रत्यक्ष उभी राहत नाही, तोपर्यंत हा संघर्ष सुरू राहील," असा निर्धार व्यक्त करत दीपक देशमुख यांनी लवकरच परळीतील पत्रकार गृहनिर्माण संस्थेचे कार्यकारी मंडळ व पत्रकार, संपादक आणि सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ घेऊन मुंबईत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि गृहनिर्माण मंत्र्यांची, खासदार बजरंग सोनवणे याची भेट घेणार असल्याचे जाहीर केले.

**पत्रकारांवर दबाव टाकल्याचा आरोप**

या कार्यक्रमाला काही पत्रकार अनुपस्थित राहिल्याबाबतही देशमुख यांनी गंभीर आरोप केले. कार्यक्रमात सहभागी झाल्यास जाहिराती बंद केल्या जातील किंवा भविष्यात अडचणी निर्माण केल्या जातील, अशा प्रकारचा दबाव काही पत्रकारांवर टाकण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. पत्रकारांना अशा पद्धतीने गप्प बसविण्याचा प्रयत्न लोकशाहीसाठी घातक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**मराठा भवन प्रकरणाची आठवण**

अलीकडेच मराठा भवनासाठी देण्यात आलेल्या जागेवरून निर्माण झालेल्या वादाचा उल्लेख करत देशमुख यांनी नगरपालिकेच्या जमीन वाटप प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित केले. संबंधित जागेवर श्री दत्त देवस्थान ट्रस्टने आक्षेप घेतल्यानंतर हे प्रकरण चर्चेत आले होते. त्याचप्रमाणे पत्रकार गृहनिर्माण संस्थेच्या जागेबाबतही प्रशासनाने स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी मागणी करण्यात आली.

**पत्रकारांच्या हक्कासाठी लढा कायम**

नोंदणी क्रमांक AF-22856 असलेल्या पत्रकार गृहनिर्माण संस्थेसाठी सर्व्हे क्रमांक ४२२ मधील ६० गुंठे जागा कायम राखावी, तिचा विकास करावा आणि पत्रकारांना दिलेले आश्वासन पूर्ण करावे, अशी मागणी या प्रतिकात्मक उद्घाटन सोहळ्यातून करण्यात आली. पत्रकारांच्या हक्काच्या या प्रश्नाला आता नवे राजकीय व सामाजिक परिमाण प्राप्त होत असून येत्या काळात हा विषय अधिक गाजण्याची चिन्हे दिसत आहेत.



# पॅरा स्विमर आभा मुंडे ची पाच सुवर्णांची विजयी हॅट्रिक

### सलग तिसऱ्या वर्षी पॅरा स्विमर आभा गणेश मुंडेची सुवर्ण झेप; 5 सुवर्णपदके आणि 2 राष्ट्रीय विक्रमांची नोंद

**बीड प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील डाबी गावची सुवर्णकन्या तथा उदयोन्मुख पॅरा जलतरणपटू आभा गणेश मुंडे हिने 26 व्या राष्ट्रीय पॅरा जलतरण स्पर्धेत दैदिप्यमान कामगिरी करत सलग तिसऱ्या वर्षी आपल्या सुवर्ण वर्चस्वाची मोहोर उमटवली आहे. बेंगळुरू येथील Zee Swim Academy येथे 8 ते 10 जून 2026 दरम्यान झालेल्या जुनियर व सब ज्युनिअर राष्ट्रीय पॅरा जलतरण स्पर्धेत आभाने सलग तिसऱ्या वर्षी तब्बल 5 सुवर्णपदके जिंकत 2 नवीन राष्ट्रीय विक्रमांची (National Records) नोंद आपल्या नावावर केली.

देशभरातील आठरा राज्यांमधील अव्वल पॅरा जलतरणपटूंच्या उपस्थितीत झालेल्या या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत आभाने आपल्या उत्कृष्ट तांत्रिक कौशल्य, अथक परिश्रम आणि जिद्दीच्या जोरावर तिच्या सर्व प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकत सुवर्ण यश संपादन केले. विशेष म्हणजे, सलग तिसऱ्या वर्षी राष्ट्रीय स्पर्धेत पाच सुवर्णपदकांची कमाई ( हॅट्रिक ) करून तिने भारतीय पॅरा जलतरण क्षेत्रात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. आभाने गेल्या तीन राष्ट्रीय स्पर्धांमध्ये एकूण 15 सुवर्णपदकांची कमाई करत सातत्यपूर्ण उत्कृष्टतेचा आदर्श निर्माण केला आहे. तिची ही कामगिरी केवळ बीड जिल्ह्यासाठीच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद ठरली आहे.

सध्या आभा बेंगळुरू येथे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पॅरा जलतरण प्रशिक्षक शरथ गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली कठोर प्रशिक्षण घेत आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच आभाच्या कामगिरीत सातत्याने उल्लेखनीय सुधारणा होत असून राष्ट्रीय स्तरावर ती नवे विक्रम प्रस्थापित करत आहे. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची आगामी आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी निवड प्रक्रिया देखील पार पडत असल्याने आभाच्या या यशामुळे तिच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधील संधी अधिक बळकट झाल्या आहेत. तिच्या या ऐतिहासिक यशाबद्दल क्रीडाप्रेमी, ग्रामस्थ, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर आणि विविध संघटनांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. “जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर अशक्य वाटणारे ध्येयही गाठता येते,” हे आभा गणेश मुंडे हिने आपल्या यशातून पुन्हा एकदा सिद्ध करून दाखवले आहे.




# विधान परिषद् निवडणुकीत महायुतीसमोर आव्हान

**नाशिक वृत्तसंस्था**



नाशिक विधान परिषद निवडणुकीला यंदा विशेष चुरस प्राप्त झाली असून महायुतीचे उमेदवार तथा विद्यमान आमदार नरेंद्र दराडे आणि अपक्ष उमेदवार गोकुळ गीते यांच्यातील थेट लढत राज्यातील राजकीय वर्तुळाचे लक्ष वेधून घेत आहे. या निवडणुकीत केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांचे संख्याबळच नव्हे, तर महायुतीतील अंतर्गत समीकरणे आणि भाजप-शिवसेना यांच्यातील समन्वयाचीही कसोटी लागली आहे.

नाशिक विधान परिषद निवडणूक सध्या राज्यभर चर्चेचा विषय ठरत आहे. महायुतीचे उमेदवार तथा विद्यमान आमदार नरेंद्र दराडे यांच्या विरोधात अपक्ष उमेदवार गोकुळ गीते यांनी जोरदार दंड थोपटल्याने ही निवडणूक अधिकच चुरशीची बनली आहे. विशेष म्हणजे गोकुळ गीते हे भाजपचे इच्छुक उमेदवार गणेश गीते यांचे बंधू असल्याने महायुतीसमोर अंतर्गत मतभेद आणि राजकीय समीकरणांचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्यामुळे विधान परिषद मतदारसंघाची निवडणूक तब्बल तीन वर्षांनंतर होत आहे. त्यामुळे या निवडणुकीकडे राज्यातील राजकीय वर्तुळाचे विशेष लक्ष लागले आहे.

महायुतीचे उमेदवार माजी आमदार नरेंद्र दराडे यांच्याविरोधात पिंपळगाव बाजार समितीचे संचालक गोकुळ गीते यांनी चांगलेच आव्हान उभे केले आहे. मावळते आमदार नरेंद्र दराडे यांना शिवसेनेकडून पुन्हा एकदा उमेदवारी मिळवण्यात यश आले आहे. नाशिक जिल्ह्यात भाजपचे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील संख्याबळ मोठे असल्याने भाजपनेही या जागेवर दावा केला होता. मात्र महायुतीतील जागावाटपात ही जागा शिवसेनेकडेच कायम राहिली आणि नरेंद्र दराडे यांना पुन्हा संधी देण्यात आली. दरम्यान, भाजपकडून गणेश गीते यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. मात्र पक्षश्रेष्ठींच्या आदेशानुसार त्यांनी आपला अर्ज मागे घेतला. त्यानंतर त्यांचे बंधू गोकुळ गीते हे कोणत्याही राजकीय पक्षाशी थेट संबंधित नसल्याने त्यांनी निवडणूक लढवण्याचा निर्णय कायम ठेवला. त्यामुळे या निवडणुकीत अनपेक्षित रंग भरले गेले आहेत.

गोकुळ गीते यांची उमेदवारी मागे घेण्यासाठी महायुतीच्या नेत्यांनी अनेक प्रयत्न केल्याची चर्चा आहे. पालकमंत्री गिरीश महाजन, मंत्री उदय सामंत आणि मंत्री दादा भुसे यांनी गीते यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. मात्र या चर्चेतून कोणताही सकारात्मक तोडगा न निघाल्याने गोकुळ गीते यांनी आपली उमेदवारी कायम ठेवत निवडणूक लढविण्याचा निर्णय निश्चित केला आहे. याच दरम्यान, दराडे यांचे नातेवाईक कुणाल दराडे यांनी गोकुळ गीते यांच्याविषयी केलेल्या कथित आक्षेपार्ह वक्तव्यामुळे राजकीय वातावरण अधिक तापले आहे. या घटनेनंतर गोकुळ गीते आणि त्यांच्या समर्थकांनी कोणत्याही परिस्थितीत माघार न घेण्याचा निर्धार केल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे ही निवडणूक आता प्रतिष्ठेची बनली आहे. राजकीय समीकरणांचा विचार करता नरेंद्र दराडे यांच्यासमोर अनेक आव्हाने उभी ठाकली आहेत.

येवला मतदारसंघातील राजकीय प्रतिस्पर्धी छगन भुजबळ यांचा विरोध, राष्ट्रवादी काँग्रेसमधील काही नाराज घटकांची भूमिका तसेच गणेश गीते यांचे भाजप आणि शिवसेनेतील अनेक नगरसेवक व पदाधिकाऱ्यांशी असलेले जवळचे संबंध यामुळे गोकुळ गीते यांचे पारडे काहीसे जड असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# आष्टीचे भूमिपुत्र डॉ. शशिकांत टेकाडे यांची शिवसेना संभाजीनगर ग्रामीण 'डॉक्टर सेल'च्या अध्यक्षपदी निवड

## खा .संदीपान भुमरे व आ .विलास भुमरे यांच्या आदेशानुसार नियुक्ती ; आष्टी तालुक्यात आनंदाचे वातावरण



आष्टी | प्रतिनिधी

आष्टी तालुक्याचे भूमिपुत्र आणि सध्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील बिडकीन येथे अविरत वैद्यकीय सेवा बजावणारे वैद्यकीय व्यावसायिक डॉ. शशिकांत टेकाडे यांची शिवसेना (एकनाथ शिंदे गट) संभाजीनगर ग्रामीण 'डॉक्टर सेल'च्या अध्यक्षपदी अत्यंत प्रतिष्ठेची निवड करण्यात आली आहे.छत्रपती संभाजीनगरचे खासदार संदीपान भुमरे आणि आमदार विलास भुमरे यांच्या विशेष आदेशानुसार ही अधिकृत निवड जाहीर करण्यात आली.

**■ बाळासाहेबांच्या विचारांचा वारसा आणि निष्ठावंत शिवसैनिक**

हिंदुहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन डॉ. शशिकांत टेकाडे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून वैद्यकीय सेवेलाच समाजसेवेचे माध्यम मानले आहे. वैद्यकीय व्यवसायासोबतच त्यांनी सामाजिक आणि संघटनात्मक क्षेत्रात अत्यंत उल्लेखनीय कार्य केले आहे. बिडकीन,कृष्णापूर या ग्रामीण भागासह संपूर्ण छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात त्यांनी एक अभ्यासू, अत्यंत सेवाभावी आणि सर्वसामान्यांच्या अडीअडचणीला मध्यरात्रीही धावून जाणारा 'हक्काचा शिवसैनिक' अशी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

**■ आरोग्य क्षेत्रातील कार्याची दखल; संघटनात्मक कामाला मिळणार गती**

आरोग्य क्षेत्रातील त्यांचे मोठे योगदान आणि समाजातील तळागाळातील घटकांशी असलेला त्यांचा थेट व जिव्हाळ्याचा संपर्क लक्षात घेऊन, शिवसेना पक्षनेतृत्वाने त्यांच्या खांद्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे.डॉ. टेकाडे यांच्या निवडीमुळे संभाजीनगर ग्रामीण भागातील डॉक्टरांचे प्रलंबित प्रश्न सुटण्यास मदत होईल, महायुती सरकारच्या माध्यमातून ग्रामीण भागात आरोग्यविषयक विविध शासकीय उपक्रम,मोफत शिबिरे आणि आरोग्य जनजागृती मोहिमांना मोठी गती मिळेल,असा विश्वास व्यक्त होत आहे.

डॉ. शशिकांत टेकाडे हे जरी सध्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आपल्या वैद्यकीय सेवेनिमित्त कार्यरत असले, तरी त्यांची मूळ नाळ आष्टी तालुक्याशी जोडलेली आहे. आष्टीचे भूमिपुत्र म्हणून त्यांनी मिळवलेल्या या बहुमानामुळे आष्टी तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून,संपूर्ण तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**■ राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांकडून कौतुकाचा वर्षाव**

डॉ.शशिकांत टेकाडे यांच्या या महत्त्वपूर्ण निवडीबद्दल आष्टी मतदार संघाचे आमदार सुरेश धस, नगराध्यक्ष जिया बेग,उपनगराध्यक्ष शैलेश सहस्रबुद्धे, माजी नगराध्यक्ष रंगनाथ अण्णा धोंडे,सरपंच अशोक मुळे, 'दैनिक झुंजारनेता'चे उपसंपादक तथा ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांच्यासह आष्टी परिसरातील सर्व पत्रकार बांधव, मित्रपरिवार, शिवसैनिक, नातेवाईक आणि हितचिंतकांनी त्यांचे अभिनंदन केले.

# आपली लेकरं गावच्या जिल्हा परिषद शाळेतच घाला

देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)

अलीकडच्या काळात ग्रामीण भागातील अनेक पालक आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी, शहराच्या दिशेने धाव घेताना दिसत आहेत.हल्ली काय झालंय, गावाकडच्या लोकांचा लई कल शहरातल्या शाळांकडं वाढलाय. आपलं पोरगं शहरातल्या इंग्लिश मिडीयमच्या शाळेत शिकतं, म्हणजे ते लई हुशार होणार, मोठ्ठं साहेब अधिकार होणार, असं अनेकांना वाटत असतं . सोन्याच्या ताटात वाढलेला घासच पौष्टिक असतो असे काही नाही. मातीच्या ताटातील भाकरी तितकीच ताकद देत असते. त्याप्रमाणे शहरातील शाळेत शिकले म्हणून विद्यार्थी हुशार होतात असे काही नाही. बुद्धिमत्ता ही शाळेच्या भिंतीमध्ये नसते, तर ती विद्यार्थ्यांच्या जिद्दीत मेहनतीत आणि स्वप्नांच्या उंच भरारीत असते.शहरातील शाळेच्या भव्य इमारती, आकर्षक गणवेश, इंग्रजीची झळाळी, आणि आधुनिकतेचे चमकदार आवरण पाहून, अनेकांना वाटतं की यशाचा मार्ग फक्त शहरातील शाळेतुनच जातो. शहरातील शाळांची चमक दुरून मोहक वाटते परंतु "चमकणारी प्रत्येक गोष्ट सोनेच असते असे नाही". साखरेचा रंग पण पांढरा आहे,




आणि मिठाचा रंग पण पांढरा आहे. परंतु चव वेगवेगळी आहे.पण खरं सांगायचं तर शहरात शिकलं म्हणजे अक्कल जास्त येते, आणि गावात शिकलं म्हणजे अक्कल कमी पडते, असं काही नसतं बघा!..कारण वाघाचं "पिल्लू जंगलातच मोठं होतं असतं, शहरात नाही". तसंच हुशारी शाळेच्या नावात नसती, ती पोराच्या जिद्दीत अन् कष्टात असती.आज जे मोठमोठे अधिकारी, डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक, पोलीस, पी एस आय,झालेत, त्यातली कितीतरी माणसं गावच्या जिल्हा परिषद शाळेतूनच शिकूनच पुढं गेलीत. त्यावेळी ना इंग्लिश मिडीयमचा एवढा गवगवा होता, ना मोठमोठ्या इमारती. पण मेहनत होती, चिकाटी होती अन् गुरुजींचं मोलाचं मार्गदर्शन होतं.शहरातल्या शाळेचा झगमगाट पाहून भुलू नका. शहरातील शाळेंना हजारात फी आहे. परंतु ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेला कसलीही फी नाही.पितळ कितीबी घासलं तरी सोनं होत नसत. तसंच भारी इमारत, भारी फी अन् दोन शब्द इंग्लिश बोललं म्हणजेच भारी शिक्षण मिळतं, असं काही नसतं.गावच्या शाळेत पोरं आपल्या मातीत वाढतात, आपल्या माणसांत राहतात. संस्कार शिकतात. गुरुजीबी आपुलकीनं शिकवतात. प्रत्येक पोराकडं लक्ष देतात. तिथं फक्त पुस्तकातलं ज्ञान नाही, तर जगायची अक्कल बी मिळते.म्हणून शहराच्या नावाला भुलू नका. "ऊस वाकडा असला तरी रस गोडच असतो", तसंच गावची शाळा साधी असली तरी शिक्षण अन् संस्कारानं भारी असते. शाळा शहरातली का गावातली यापेक्षा, पोराच्या डोक्यात ज्ञान किती अन् मनात संस्कार किती, हे जास्त महत्त्वाचं! गावची शाळा वाचवा.गावची लेकरं घडवा. आपल्या मातीतूनच उद्याचे अधिकारी तयार करा...!... वटवृक्षाची उंची त्यांच्या फांद्यामुळे नसते, तर वटवृक्षाच्या मुळांच्या सामर्थ्यामुळे असते.

# कर्णबधिर विद्यार्थिनी शाश्वती कांबळेची यशोगाथा : जिद्द, चिकाटी आणि परिश्रमांच्या बळावर एसएससी बोर्डात प्रथम क्रमांक

परभणी | प्रतिनिधी

दिव्यांगत्व हे यशाच्या मार्गातील अडथळा नसून जिद्द, मेहनत आणि सातत्याच्या जोरावर कोणतेही ध्येय गाठता येते, हे स्व. रामराव कान्हेकर

निवासी मूकबधिर विद्यालय, परभणी येथील विद्यार्थिनी शाश्वती माधव कांबळे (बिट्टू) हिने आपल्या उल्लेखनीय यशातून सिद्ध करून दाखविले आहे. कर्णबधिर दिव्यांगत्वावर मात करत शाश्वतीने दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करून एसएससी बोर्डामध्ये प्रथम क्रमांक मिळविल्याने तिच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

शाश्वतीच्या या यशामुळे तिच्या आई-वडिलांची मान अभिमानाने उंचावली असून त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले आहेत. तिची जिद्द, कठोर परिश्रम, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यास यांचे हे यशस्वी फलित असल्याची भावना व्यक्त होत आहे.

या प्रसंगी तिचे कौतुक करताना मान्यवरांनी सांगितले की, दिव्यांगत्व हे यशाच्या आड येत नाही. सामान्य विद्यार्थ्यांप्रमाणेच शिक्षण घेऊन आणि ज्ञानाची कसोटी पार करत उल्लेखनीय यश मिळविता येते, याचे जिवंत उदाहरण शाश्वती आहे. तिच्या या यशाने समाजातील अनेक दिव्यांग विद्यार्थ्यांना नवी प्रेरणा मिळणार आहे.



शाश्वतीच्या सत्कारप्रसंगी पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी तिला शुभेच्छा देण्यात आल्या. या यशामुळे तिच्यावर सामाजिक जबाबदारीही वाढली असून, भविष्यातही याच जिद्दीने प्रगती करत स्वतःचा, पालकांचा, शाळेचा आणि समाजाचा गौरव वाढवावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. मिलिंद कान्हेकर, शाळेचे मुख्याध्यापक आर. जी. सोनवणे, तसेच शिक्षक प्रसाद कुलकर्णी, के. एल. शिंदे, आर. डी. लाशे, एस. डी. पोटभरे, ए. सी. हिंगोले, विठ्ठल घाटे, खरात सर, आळणे सर, कुंडकर, आगळे, अमोल, लहू पांढरे, राहुल राठोड, एस. पी. जायभाये, कोळेश्वर मॅडम, असोलेकर मॅडम, गवारी मॅडम, गाजरे मॅडम आणि कमल साळवे आदींनी शाश्वतीचे अभिनंदन करून तिच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या.

शाश्वती कांबळे हिच्या या उल्लेखनीय यशामुळे स्व. रामराव कान्हेकर निवासी मूकबधिर विद्यालय, परभणीच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला असून, तिची यशोगाथा अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# शाळा सुरु होण्यापूर्वी अभिनव कार्यशाळा : डॉ. चंद्रशेखर मुरादे मार्गदर्शक

**अमरावती |** जून महिन्याच्या शेवटी विदर्भातील शाळा सुरू होणार आहेत. त्या दृष्टिकोनातून सुज्ञ व सुजाण पालकांना अध्यापकांना व विद्यार्थ्यांना योग्य ती दूरदृष्टी देण्याच्या दृष्टिकोनातून एका अभिनव व दिशादर्शक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा नेदरलँड फ्रान्स अबुधाबी येथे कार्यरत असलेले जागतिक कीर्तीचे संशोधक व नवीन दृष्टी देणारे डॉ.चंद्रशेखर मुरादे हे घेणार आहेत. या कार्यशाळेचे आयोजन अमरावती परतवाडा रोडवरील वलगाव येथील सिकची रिसॉर्ट मधील वातानुकूलित कृषी भवन येथे करण्यात आलेले आहे. डॉ. पंजाबराव देशमुख आयएएस अकॅडमी मिशन आयएएस व प्रेमकिशोर सिकची चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यशाळेमध्ये नोंदणी केलेल्या प्रतिनिधींना प्रवेश देण्यात येईल. या कार्यशाळेमध्ये वर्ग पाच ते वर्ग 10 या वर्गातील विद्यार्थी त्यांचे पालक व शिक्षक सहभागी होऊ शकतात. या कार्यशाळेला प्रथम येणाऱ्या 50 प्रतिनिधींना प्रवेश देण्यात येणार आहे. त्यासाठी इच्छुक पालकांनी अध्यापकांनी व विद्यार्थ्यांनी अग्रीम नोंदणीसाठी मिशनचे संचालक प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे यांच्याशी 9890967003 या क्रमांकावर संपर्क साधावा. ही कार्यशाळा रविवार दिनांक 14 जून रोजी सकाळी 11 ते एक अशी दोन तासाची असणार आहे. ह्या दूरदृष्टी देणाऱ्या कार्यशाळेचा लाभ पालकांनी शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी घ्यावा असे आवाहन मिशनचे संचालक प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे व प्रेमकिशोर सिकची चॅरिटेबल ट्रस्टचे संचालक श्री सचिन माळकर यांनी एका संयुक्त पत्रकातून केलेली आहे.

## लोकरंजन

# "बेवारस - सत्य एका वळणावरचं" चित्रपटाचा टीजर लाँच

मराठी रंगभूमी, मराठी-हिंदी चित्रपटसृष्टीतील महान अभिनेते, दिवंगत विक्रम गोखले यांचा अखेरचा चित्रपट असलेल्या "बेवारस सत्य एका वळणावरचं" या चित्रपटाचा टीजर लाँच करण्यात आला आहे. अतिशय हृदयस्पर्शी कथानक, उत्तम स्टारकास्ट टीजरमध्ये दिसत आहे.२५ जून रोजी हा चित्रपट संपूर्ण जगभरात प्रदर्शित होणार आहे. हरिणी प्रॉडक्शन्स निर्मित "बेवारस सत्य एका वळणावरचं" या चित्रपटाची कथा विजय राणे आणि दिग्दर्शन विजय राणे व सौ. रिया कुमार यांचे आहे. चित्रपटात विक्रम गोखले यांच्यासह तेजस्विनी पंडित, रोहिणी हट्टंगडी, उषा नाईक, निहार गिते, ऋतुजा बागवे, उदय टिकेकर, श्रीजित मराठे, आदित्य देशमुख यांच्या प्रमुख भूमिका आहेत. अनाथालय चालवणाऱ्या तत्त्वनिष्ठ आबाजींची भूमिका विक्रम गोखले यांनी साकारली आहे. पायाने अधू असलेल्या एका अनाथ मुलाचा कोर्टकचेरी संघर्ष याची कहाणी बेवारस या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. सामाजिक परिस्थितीचा पदरही या कथानकाला आहे. यात विक्रम गोखले यांच्या आर्त, भावनिक अभिनयाची झलक टीजरमध्ये दिसते. हृदयस्पर्शी कथानक, उत्तम स्टारकास्टमुळे प्रेक्षकांना दमदार अभिनयाची पर्वणी मिळणार असल्याचा विश्वास टीजरमुळे निर्माण झाला आहे.




# क्राईम थ्रिलर 'राख' चा थरारक ट्रेलर प्रदर्शित

भारतातील सर्वात लोकप्रिय मनोरंजन प्लॅटफॉर्म, प्राइम व्हिडिओने, त्यांच्या आगामी प्राइम ओरिजिनल इन्व्हेस्टिगेटिव्ह क्राईम थ्रिलर 'राख'चा थरारक ट्रेलर प्रदर्शित केला. या काल्पनिक मालिकेचे दिग्दर्शन आणि कार्यकारी निर्मिती प्रोसित रॉय यांनी केली असून, अनुषा नंदकुमार आणि संदीप साकेत यांनी तिची निर्मिती, लेखन आणि सह-दिग्दर्शन केले आहे, ट्रेलरमध्ये एका क्रूर आणि अकल्पनीय गुन्ह्याची झलक पाहायला मिळते, जो केवळ पीडितांच्या कुटुंबांनाच उद्ध्वस्त करत नाही, तर अस्तित्वात असलेल्या हिंसाचार आणि मानवी अधःपतनाची विचलित करणारी खोली देखील उघड करतो. या मालिकेत सोनाली बेंद्रे, अली फजल आणि आमिर बशीर मुख्य भूमिकेत असून, आकाश मखिजा, रमणदीप यादव, दिव्या शर्मा, विवान शर्मा, अंशुल चौहान, राकेश बेदी आणि दिब्येंदू भट्टाचार्य महत्त्वपूर्ण भूमिकांमध्ये आहेत. 'राख' हा चित्रपट १२ जून रोजी भारतात आणि जगभरातील २४० हून अधिक देशांमध्ये व प्रदेशांमध्ये केवळ प्राइम व्हिडिओवर प्रदर्शित होणार आहे.




# नाट्यरंग : कॉफीशॉप मध्ये मिळाली "बनवाबनवी" नाटकाची ऑफर

एका वेगळ्या प्रोजेक्टच्या मिटिंगसाठी मी एका कॉफी शॉपमध्ये गेलो होतो. तो प्रोजेक्ट तर झाला नाही. पण बाजूच्याच टेबलावर मला माझा मित्र आणि प्रभात थिएटर्स चा निर्माता हर्षद कठापूरकर भेटला आणि त्याने मला "बनवाबनवी" नाटक लिहिण्यासाठी आणि दिग्दर्शन करण्यासाठी विचारलं!गंमत म्हणून दिलेला तो होकार आयुष्य बदलणाऱ्या प्रवासाची सुरुवात ठरेल, याची तेव्हा कल्पनाही नव्हती.गेली १५ वर्षं अभिनेता म्हणून रंगभूमीवर काम करताना मला वाटायचं की नाटक कसं घडतं हे मला पूर्णपणे



माहिती आहे. पण "बनवाबनवी"ने माझ्या अनेक ठाम समजुती अक्षरशः मोडून काढल्या. मुहूर्ताच्या दिवशी माझ्यासमोर फक्त एकच गोष्ट होती. एका कोऱ्या कागदावर लिहिलेलं "बनवाबनवी" हे नाव. कथा नव्हती.पात्रं नव्हती.संवाद नव्हते.होतं फक्त एक स्वप्न...आणि ते सत्यात उतरवण्याची जिद्द.

मराठी रंगभूमीवर कंटेंट क्रिएटर्सना केंद्रस्थानी ठेवून उभं राहणारं हे पहिलंच नाटक. शंतनू रांगणेकर वगळता बाकी सर्व कलाकार माझ्यासाठी नवीन होते आणि मी त्यांच्यासाठी. सगळेजण मला विचारत होते ,"सर, माझं पात्र कसं आहे?""माझा रोल काय आहे?"आणि माझ्याकडे उत्तर म्हणून फक्त एकच गोष्ट होती..."थोडा विश्वास ठेवा. पण त्या सगळ्यांमध्ये एक गोष्ट समान होती,अटळ जिद्द! आणि तिथून सुरू झाला "बनवाबनवी"चा खरा प्रवास.

# टेलीरंग : स्त्रीशक्तीची कहाणी 'कृष्णाईच्या लेकी' 15 जूनपासून झी मराठीवर

समाजाने घालून दिलेल्या चौकटी मोडून स्वतःचा मार्ग निर्माण करणाऱ्या एका आईची आणि तिच्या मुलींची ही प्रेरणादायी गोष्ट अनेकांना विचार करायला भाग पाडेल. ही कथा आहे कृष्णाईची, जी आयुष्यातील अनेक संकटांचा सामना करत आपल्या मुलींना योग्य संस्कार, शिक्षण आणि आत्मविश्वास देऊन घडवते. मुलीच जन्माला आल्यामुळे तिच्या पतीने दुसरे लग्न केले आणि समाजाकडून तसेच कुटुंबाकडून तिला सतत कमी लेखल गेले. मात्र या सर्व परिस्थितींमध्येही कृष्णाई कधीच खचत नाही. मुलगा नसल्यामुळे स्त्रीचे मूल्य कमी होत नाही, तर मुलीही मुलांइतक्याच सक्षम असतात, हा विश्वास ती आपल्या कृतीतून सिद्ध करते. कृष्णाईच्या तीन मुलींचा प्रवास या मालिकेचा केंद्रबिंदू आहे. मोठी मुलगी शारदा शांत, संयमी आणि आईप्रमाणे समजूतदार आहे.

**संकलन –संयोजन : सुबोध रणशेवरे**

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, शुक्रवार 12 जून 2026



# तांदुळजा खुल्या क्रिकेट स्पर्धेतील आमदार चषक तिरंगा क्रिकेट क्लब मसला संघाने पटकावला

## यशस्वी संघांना भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते बक्षीस वितरण

लातूर | प्रतिनिधी


लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे कार्यसम्राट आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या जन्मदिनानिमित्ताने लातूर तालुक्यातील मौजे तांदूळजा येथे आयोजित करण्यात आलेल्या आमदार चषक खुल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत मसला येथील तिरंगा क्रिकेट क्लब सर्वप्रथम विजेता ठरला असून या स्पर्धेतील प्रथम, द्वितीय आणि तृतीय संघांना बक्षीस वितरण करण्यात आले.

लातूर तालुक्यातील मौजे तांदूळजा येथे आ. रमेशआप्पा कराड यांच्या जन्मदिनानिमित्ताने मोठ्या उत्साहाच्या वातावरणात आमदार चषक खुल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा झाल्या. या स्पर्धेत तब्बल ३२ संघाने सहभाग घेतला होता. यशस्वी संघांना लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते रोख पारितोषिक, चषक, मेडल आणि सन्मानपत्राचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी संगायो समिती अध्यक्ष बन्सी भिसे, भाजपाचे मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, सुरज शिंदे, अशोक सावंत, भैरवनाथ पिसाळ, बाबा भिसे आदींची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी स्पर्धेतील यशस्वी खेळाडूंचे आ. कराड यांनी कौतूक केले.

आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते स्पर्धेतील यशस्वी प्रथम क्रमांक तिरंगा क्रिकेट क्लब मसला ३१ हजार रुपये व चषक, द्वितीय क्रमांक श्री गणेशा क्रिकेट क्लब कानडी बोरगाव २१ हजार रुपये व चषक, तृतीय पारितोषक कॉमन वेल्थ क्रिकेट क्लब बोरडा ११ हजार रुपये व चषक मॅन ऑफ द सिरीज राहुल राठोड, मॅन ऑफ द मॅच समाधान सोनटक्के बेस्ट विकेट किपर विजय आल्टे यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी अंकुश गणगे, संतोष गायकवाड, नरेंद्र अल्टे, रामहरी भिसे, सचिन कांबळे, नुरखाॅ पठाण, विष्णू कसबे, बाबा नवगिरे, बिभीषण शिंदे, शैलेश कसबे यांच्यासह विजयी तिन्ही संघातील खेळाडू व क्रीडा प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## वाढदिवसाचा अनोखा उत्साह गावकऱ्यांकडून गोविंद पांडुरंग ढाकणे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव!



प्रवासादरम्यान यात्रेतील एका विशेष घडामोडीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. यात्रेच्या मार्गावरच वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित प्रत्येकाने अतिशय उत्साहात आणि आपुलकीने त्यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. वाढदिवसाचा हा आनंद द्विगुणित करण्यासाठी प्रत्येकाने त्यांच्यासोबत आठवणीचे फोटो आणि सेल्फी घेतले. हा आनंदाचा क्षण आणि शुभेच्छांचे फोटो सध्या शिवसेना वर्तुळात तसेच सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत असून, राजकीय व सामाजिक स्तरातूनही त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# अल्पवयीन मुलीच्या अपहरण प्रकरणात आरोपीला पाठीशी घातल्याचा आरोप; आष्टी तहसील कार्यालयासमोर पीडित मातेचे आमरण उपोषण

आष्टी | प्रतिनिधी

लग्नाचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीला पळवून नेल्याप्रकरणी अंभोरा पोलिसांकडून मुख्य संशयित आरोपीला पाठीशी घातले जात असल्याचा गंभीर आरोप करत, गहुखेल येथील पीडित मातेसह कुटुंबियांनी आज, ११ जून रोजी सकाळी आष्टी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. सोनाली सुभाष आहेरकर असे उपोषणास बसलेल्या आईचे नाव असून, या आंदोलनामुळे आष्टी तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, गहुखेल येथील रहिवासी असलेल्या सोनाली आहेरकर यांच्या अल्पवयीन मुलीला गत ३० मे २०२६ रोजी मौजे तागडखेल येथील रहिवासी केशव गव्हाणे याचा मुलगा शिवम केशव गव्हाणे याने लग्नाचे आमिष दाखवून फुस लावून पळवून नेले. या घटनेनंतर पीडित मातेने तातडीने अंभोरा पोलीस ठाण्यात धाव घेऊन शिवम गव्हाणे याच्याविरोधात लेखी फिर्याद दिली होती. मात्र, अंभोरा पोलिसांनी मुख्य संशयित आरोपीचे नाव माहित असूनही जाणीवपूर्वक त्याला गुन्ह्यातून वगळले आणि अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा रजिस्टर नंबर १७२/२०२६ नुसार गुन्हा दाखल केला, असा आरोप उपोषणकर्त्या महिलेने केला आहे.

गुन्हा दाखल झाल्यापासून पीडित कुटुंब दररोज अंभोरा पोलीस ठाण्यात चकरा मारत असून मुलीचा शोध घेण्याची विनंती करत आहे. मात्र, पोलीस कर्मचारी या गंभीर घटनेची दखल घेत नसून संशयित शिवमच्या नातेवाईकांची साधी चौकशी देखील करायला तयार नाहीत. त्यातच, 'जर पोलिसांतील गुन्हा मागे घेतला, तरच तुमची मुलगी तुमच्या ताब्यात परत देऊ', असा निरोप शिवम गव्हाणे याचे कुटुंबीय हस्ते-परहस्ते पीडित कुटुंबाला पाठवून उघड धमकी देत आहेत. या धमकीबाबतही अंभोरा पोलिसांना माहिती देण्यात आली, परंतु पोलिसांनी त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले.

मुलीचा शोध लागत नसल्याने आणि पोलिसांच्या अशा ढिसाळ व निष्काळजी कारभारामुळे आहेरकर कुटुंब सध्या तीव्र मानसिक तणावाखाली आहे. अंभोरा पोलिसांकडून आता न्याय मिळण्याची कोणतीही आशा उरली नसल्याने, अखेर हताश होऊन सोनाली आहेरकर यांनी आजपासून आष्टी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. जोपर्यंत मुलीचा सुरक्षित शोध लागत नाही आणि दोषींवर कडक कारवाई होत नाही, तोपर्यंत उपोषण मागे न घेण्याचा पवित्रा पीडित कुटुंबाने घेतला असून, आता प्रशासन यावर काय पावले उचलणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# बीबीएफ यंत्राद्वारे पेरणी केल्यास उत्पादन वाढीस मदत; शेतकऱ्यांनी बीबीएफने पेरणी करावी - विजयकुमार पवार

अंबाजोगाई | प्रतिनिधी :

अंबाजोगाई तालुक्यातील शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील पेरणी करताना बीबीएफ यंत्राचा वापर करावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी विजयकुमार पवार यांनी केले आहे. बदलत्या हवामान परिस्थितीचा विचार करता आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेती करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

सध्या खरीप हंगामाची तयारी सुरू असून अनेक भागांत पावसाने हजेरी लावली आहे. मात्र, केवळ पाऊस पडल्यामुळे घाईघाईने पेरणी न करता शेतामध्ये पेरणीयोग्य ओलावा निर्माण झाल्यानंतरच पेरणी करावी, असा सल्लाही कृषी विभागाने शेतकऱ्यांना दिला आहे. योग्य ओलावा नसताना केलेली पेरणी उगवण कमी होण्यास कारणीभूत ठरू शकते, असेही पवार यांनी नमूद केले.



बीबीएफ पद्धतीमध्ये शेतात उंच वाफे आणि सऱ्या तयार करून पेरणी केली जाते. त्यामुळे पावसाचे अतिरिक्त पाणी सऱ्यांमधून सहज निघून जाते. परिणामी पाणथळ परिस्थिती निर्माण होत नाही आणि पिकांच्या मुळांना आवश्यक हवा व ओलावा मिळत राहतो. विशेषतः सोयाबीन, तूर, मूग, उडीद यांसारख्या पिकांसाठी ही पद्धत अत्यंत उपयुक्त ठरत असल्याचे कृषी तज्ज्ञांचे मत आहे. तालुका कृषी अधिकारी विजयकुमार पवार यांनी सांगितले की, बीबीएफ पद्धतीचा अवलंब केल्यास पिकांची उगवण एकसारखी होते. पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा झाल्यामुळे अतिवृष्टीच्या काळात पिकांचे नुकसान कमी होते. तसेच जमिनीतील ओलावा संतुलित राहिल्यामुळे पिकांची वाढ चांगली होते आणि उत्पादन वाढीस मदत मिळते.

याशिवाय या पद्धतीमध्ये तण नियंत्रण करणे सोपे जाते. आंतरमशागत व इतर कृषी कामे सुलभपणे करता येतात. त्यामुळे मजुरी खर्चात बचत होऊन शेती अधिक किफायतशीर बनते. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत शेतीसाठी बीबीएफ तंत्रज्ञान प्रभावी ठरत असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

## मोफत सोयाबीन बियाणे वाटपात गोंधळ?

# आष्टीत छोट्या शेतकऱ्यांवर अन्याय झाल्याची चर्चा

**फडणवीस-शिंदे सरकारची योजना कागदावरच? पात्र शेतकरी वंचित राहिल्याचा आरोप; कृषी विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह**




आष्टी | प्रतिनिधी:

शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने मोठ्या गाजावाजात मोफत सोयाबीन बियाणे वाटप योजना राबवली. मात्र आष्टी तालुक्यात या योजनेची अंमलबजावणी वादाच्या भोवऱ्यात सापडली असून, छोट्या व अल्पभूधारक शेतकऱ्यांवर अन्याय झाल्याची जोरदार चर्चा तालुकाभर सुरू आहे. शासनाने शेतकऱ्यांच्या हितासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून उपलब्ध करून दिलेले बियाणे प्रत्यक्षात पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचले की नाही, याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

ऑनलाईन नोंदणी करूनही अनेक शेतकरी कृषी कार्यालयाच्या दारातून रिकाम्या हाताने परतल्याचे बोलले जात आहे. विशेष म्हणजे, छोटा सातबारा असलेल्या शेतकऱ्यांना "नियम" आणि "पॅकिंग" यांसारखी कारणे सांगून बियाणे नाकारण्यात आल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे. त्यामुळे शासनाच्या कल्याणकारी योजनेचा लाभ नेमका कोणाला मिळाला, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

काही शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, मोठ्या जमीनधारकांना सहजपणे बियाणे मिळाले; मात्र अल्पभूधारक आणि अत्यल्प क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांना पॅकेट फोडून आवश्यक प्रमाणात बियाणे देण्याऐवजी सरळ परत पाठविण्यात आले. त्यामुळे "शेतकरी हिताची योजना" प्रत्यक्षात छोट्या शेतकऱ्यांसाठीच बंद दार ठरली का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. दूरवरून प्रवास करून आलेल्या शेतकऱ्यांना तासन्तास प्रतीक्षा करूनही बियाणे मिळाले नाही, अशी नाराजी व्यक्त होत आहे. काही ठिकाणी लाभार्थी निवडीच्या निकषांबाबतही संभ्रमाचे वातावरण निर्माण झाल्याचे बोलले जात आहे. तालुक्यात किती बियाणे प्राप्त झाले? किती वितरित झाले? किती शिल्लक आहे? किती अर्जदार पात्र होते? किती जणांना लाभ नाकारण्यात आला? या सर्व प्रश्नांची अधिकृत माहिती कृषी विभागाने तातडीने सार्वजनिक करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. शेतकरी संघटना आणि नागरिकांच्या मते, शासनाने पाठविलेल्या बियाण्यांचे वितरण पारदर्शक पद्धतीने झाले असल्यास आकडेवारी जाहीर करण्यास कोणतीही अडचण नसावी. मात्र माहिती देण्याबाबत होत असलेला विलंब संशय अधिक गडद करत असल्याची चर्चा आहे.

### चौकशी समिती नेमण्याची मागणी

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी उच्चस्तरीय समिती नेमावी, अशी मागणी आता तालुक्यातून होत आहे. वितरण प्रक्रियेत निष्काळजीपणा, पक्षपात किंवा प्रशासकीय त्रुटी आढळल्यास संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

### शेतकऱ्यांचा संताप उफाळला

"ऑनलाईन अर्ज केला, कागदपत्रे पूर्ण होती, तरी बियाणे मिळाले नाही. दूरवरून आलो पण रिकाम्या हाताने परत जावे लागले. नियमांचे कारण सांगून आम्हाला नाकारण्यात आले."

### वितरण प्रक्रियेत पारदर्शकता का दिसली नाही? आता शासन उत्तर देणार का?

राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनेच्या अंमलबजावणीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याने आष्टी तालुक्यातील शेतकरी उत्तरांच्या प्रतीक्षेत आहेत. शासनाच्या नावाने आलेले बियाणे खरोखर गरजू आणि पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले की कागदोपत्रीच वितरण पूर्ण झाल्याचे दाखविण्यात आले, याची वस्तुस्थिती समोर येणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे. मोफत बियाणे वाटपाच्या नावाखाली जर छोट्या शेतकऱ्यांवर अन्याय झाला असेल, तर ही केवळ प्रशासकीय चूक नसून शेतकरी हिताच्या योजनांवरील विश्वासाला तडा देणारी बाब ठरेल, अशी तीव्र प्रतिक्रिया तालुक्यातून उमटत आहे.